# प्रकरण पाचवे    स मा रो प

## प्रकरण पाचवे

## समारोप

8 मार्च 1948 ला फलटण संस्थान मुंबई प्रांतात विलीन झाले व सातारा जिल्ह्यातील फलटण हा एक तालुका बनला. काळाबरोबर मालोजीराजांनीसुध्दा आपले राजेपद सोडून लोकशाहीचा एक नम्रसेवक बनण्याचे ठरविले. स्वातंत्र्योत्तर काळात ते काँग्रेसमध्ये सामील झाले. सन 1948 च्या मुंबई प्रातांच्या मंत्रीमंडळात मालोजीरावांना घेण्यात आले. त्यावरून त्यांची योग्यता किती मोठी होती हे सहज लक्षात येते.

ह्या संबंधी मुंबई प्रातांचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर आपली आठवण पुढीलप्रमाणे देतात--

"सन 1948 साली दुसरे मंत्रिमंडळ बनवितांना श्री शंकरराव देव याचे मार्फत माझा व राजेसाहेबांचा परिचय झाला व मी त्यांना मंत्रीमंळामध्ये येण्याची विनंती केली.

तेव्हा (मालोजीराव) एक सरळ स्वभावाचे, जातिभेदाचे उन्मूलन करू इच्छिणारे, सरळ अंतःकरणाचे गृहस्थ आहेत, त्यांचे चितांत जातीचा किंवा कुळाचा अभिमान मुळीच नाही सर्व चांगल्या कार्यात मदत करण्याची त्यांची प्रवृती आहे."[1]

अशारीतीने मालोजीराव यांना सन 1949 ला खेर मंत्रीमंडळात समाविष्ट करण्यात आले व त्यांच्याकडे स्थानिक स्वराज्य संस्था, हे खाते देण्यात आले. इतर संस्थानिक चैनी-विलासात दिवस घालवत होते. तर मालोजीराव हे मुंबई सारख्या एका मोठया प्रांताचे मंत्री होवून सर्वसामान्य लोकांचे प्रश्न सोडवत होते. पुर्वी त्यांना संस्थानिक म्हणून प्रशासनाचा अनुभव होता त्याचा फायदा त्यांना पुढील आयुष्यात झालेला दिसून येतो कारण ते यशस्वी मंत्री झालेले आहेत.

सन 1952 ला भारतात लोकसभेच्या व विधान सभेच्या सार्वजनिक पहिली निवडणूक झाली. काँग्रेस पक्षामार्फत मतदार संघातुन मालोजीराव हे मुंबई विधान सभेवर निवडून आले. काँगेस पक्षातील त्यांचे स्थान अधिक बळकट होऊ लागले, त्यानंतर मुरारजी देसाईच्या मंत्रीमंडळात ते सार्वजनिक खात्याचे मंत्री झाले. सार्वजनिक खात्यांचे मंत्री असताना कोयना धरणासारखे मोठमोठे

प्रकल्प सुरू केले. तसेच मुंबई प्रातांत अनेक लहान मोठी धरणे बांधण्याचे कामही हाती घेतलेले दिसते. ह्याच काळात यशवंतराव चव्हाण व मालोजीराव यांचे राजकिय संबंध थोडे तणावाचे दिसतात कारण मालोजीराव हे कॉंग्रेस पक्षात आपल्यापेक्षा श्रेष्ठ ठरतील म्हणून यशवंतराव चव्हाणांना भिती वाटत होती.

मुंबई प्रातांत महाराष्ट्र एकीकरण समितीचा जोर वाढत होता अशा पार्श्वभूमिवर सन 1957 च्या दुस-या सार्वजनिक निवडणूका लागल्या ही निवडणूक मालोजीराजांनी फलटण मतदार संघातुन लढविली, सन 1957 ला महाराष्ट्र कॉंग्रेस विरोधी वातावरण जोरात होते ,ब-याच ठिकाणी महाराष्ट्र एकीकरण समितीचे उमेदवार निवडून आले. मालोजीराव यांना या निवडणूकीत अपयश आले.

काग्रेस नेत्यांनी मालोजीरावांच्या अनुभवाचा व संघटन कौशल्याचा उपयोग घेण्याचे ठरविले म्हणून 1957 ला मालोजीरावांना महाराष्ट्र प्रदेश कॉंगेसचे अध्यक्ष करण्यात आले. सन 1957 ते 1962 या काळात मालोजीराव हे महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस चे अध्यक्ष झालेले होते. सर्व महाराष्ट्रभर त्यांनी दौरा काढुन कॉंग्रेस संघटना बळकट केली. स959 ला कोल्हापूर दौ-याच्या वेळी कॉंग्रेस पुढा-यांना सांगितले कि जास्तीतजास्त कॉंग्रेसचे सभासद करा व राज्यात कॉंग्रेस चे स्थान बळकट करा.

सन 1962 च्या सार्वत्रीक निवडणूकीत मालोजीराव फलटण मतदारसंघातील निवडणूक लढवुन विजयी झाले. त्यावेळी महाराष्ट्रांत यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री बनले. परंतु यशवंतराव चव्हाणांनी अतिशय चाणाक्षपणाने मालोजीरावांना मंत्री मंडळातून वगळले ,तरीपण कॉंग्रेस चे ते कार्य करीतच राहिले. त्याचबरोबर संस्थानात काही जनहिताची कामे चालूच ठेवली होती इ.स. 1955 ला "श्रीराम सहकारी साखर कारखान्याची उभारणी केली व फलटण च्या जनतेस एक औद्योगिक क्षेत्र निर्माण करून दिले तसेच 1958 ला मुधोजी कॉलेज स्थापन करून फलटण तालुक्यात महाविद्यालय शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.

पुढे कॉंग्रेसचे विभाजन झाल्यानंतर संघटना कॉंग्रेस अध्यक्ष म्हणून काही काळ त्यांनी काम केलेले आहे. शेवटी रविवार दि.14-5-1978 ला दुपारी 12.30 वाजता पुणे मुक्कामी त्यांचे दु:खद निधन झाले.

अशारितीने शेवटचे संस्थानिक मालोजीराजे हे कायमपणे शरीराने फलटण नगरवाशियांच्यामधुन निघुन गेले तरी त्यांनी केलेल्या कार्याचा वारसा हा पुढील पिढीस मार्गदर्शक आहे.

आधुनिक भारताच्या इतिहासात फलटण शहराला जे सांस्कृतिक ,शैक्षणिक महत्व प्राप्त झाले ते मुधोजीराव व मालोजीराव यांनी केलेल्या कार्यामुळेच होय. फलटण संस्थान सन 1284 ला अस्तित्वात आले ,1948 ला भारतात विलीन झाले.

मध्ययुगीन काळात फलटण संस्थानाच्या नाईक निंबाळकर घराण्याला अनन्यसाधारण महत्व आले आहे त्याचे कारण म्हणजे त्यांचे शौर्य व त्यांनी केलेली मराठे इतिहासातील कामगिरी होय. शिवाजीमहाराजांचे आजोबा मालोजी यांची पत्नी उमाबाई ह्या फलटण नाईक निंबाळकर घराण्यातुनच आलेल्या होत्या. छ. शिवाजी माहाराजांची राणी सईबाई ह्यापण फलटण नाईक निबाळकर घराण्यातीलच होय. तसेच शिवाजी महारांजाची कन्या सखुबाई हिचे लग्न फलटणच्या नाईक निंबाळकर घराण्यातील बजाजीचा मुलगा महादजी ह्याच्याबरोबर झालेले होते. यावरून छ. शिवाजी महाराजाचे भोसले घराणे यांचे वैवाहिकसंबंध नाईक निबांळकर घराण्याशी होते कारण फलटण चे निंबाळकर घराणे प्राचीन व शुर होते तसेच त्याकाळी त्या घराण्यास एक प्रतिष्ठा लाभलेली होती. पुढे पेशवाईच्याकाळात काही लढायातुन फलटणच्या नाईक निंबाळकरांनी मराठी सत्तेची सेवा केलेली दिसते. सन 1818 नंतर म्हणजेच पेशवाइच्या अंता नंतर सातारा छ. चे फलटण हे एक मांडलीक संस्थान झाले. 1933 पर्यन्त मुंबई प्रातांशी संबंध तर 1933 नंतर या संस्थानचे सरळ दिल्ली सरकारशी संबंध प्रस्थापति झाले. 1820 ला ईस्ट इंडिया कंपनी व फलटण चे नाईक निंबाळकर यांच्यात करार होऊन फलटण हे एक मांडलीक संस्थान बनले.

20 व्या शतकात फलटणचा इतिहास गौरवशाली बनला तो शेवटच्या दोन अधिपतींच्या कार्यकर्तृत्वामुळे . सन 1860 मध्ये श्रीमंत मुधोजीराव नाईक यांना संस्थानची मुखत्यारी मिळाल्यानंतर त्यांनी सन 1916 पर्यंत आपल्या प्रदिर्घ कालावधीत संस्थानचा सर्वागिण विकास करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव श्रीमंत मालोजीराव नाईक यांनी सन 1917 ते 1948 पर्यन्त संस्थानात अनेक पुरोगामी योजना आखुन संस्थानचा सामाजिक, आर्थिक, प्रशासकिय विकास घडवून आणला.

20 व्या शतकातील फलटण संस्थानचे स्थान हे प्रतिष्ठित होते कारण मुधोजीराव व मालोजीराव यांनी संस्थानची सर्वागीण प्रगति केलेली दिसून येते ते मागील चारही प्रकरणात सविस्तर सांगितले आहे. ह्या काळात शिक्षण, सहकार, शेती, क्रिडा, उद्योगधन्दे इ. क्षेत्रात सर्वागिण प्रगति

झालेली दिसून येते.

समाजात स्त्रीचे स्थान हे स्त्रीच्या शिक्षणावर त्याचप्रमाणे मतस्वातंत्र व आर्थिक स्वातंत्र्यावर अवलंबून असते, संस्थानात एकोणिसाव्या शतकापेक्षा विसाव्या शतकामध्ये स्त्रीयांचा दर्जा चांगला होता. फलटण संस्थानात स्त्रीयांचे शिक्षण मोफत, या संस्थानिकांनी मोफत केले होते.

संस्थानातील शेती हा लोकाचा मुख्य व्यवसाय होता म्हणून शेती विकास साधण्यासाठी मालोजीरावाने अनेक लोकोपयोगी योजना राबवलेल्या दिसतात. 1925 मध्ये नीरा कॅनॉलचे पाणी संस्थानला मिळू लागल्यानंतर ऊसाचे उत्पन्न वाढले . ऊसाच्या बाबतीत संशोधन करण्यासाठी पाडेगाव ह्या ठिकाणी ऊस संशोधन केंद्र ब्रिटिश सरकार मार्फत सन 1932 मध्ये सुरू करण्यात आले. या संशोधन केंद्राचे फारच मोलाचे मार्गदर्शन संस्थानातील शेतक–यांना झाले. शेतक–यांना विहिरीकरिता ,बैलखरेदीकरिता बियाणेसाठी आर्थिक सहाय्य संस्थानामार्फत व सहकारी सोसायंटयामार्फत करण्यात येत असे. 1925 नंतर संथानातील ओलीताचे क्षेत्र व संस्थानच्या महसुल उत्पन्नात भर पडल्याचे दिसून येते. संस्थानात व्यापार वाढीसाठी मालोजीरावांनी विशेष प्रयत्न केलेले आहेत. तसेच काही रस्ते तयार करून इतर शहराशी दळणवळण सुखकर केले आहे. किशोरसिंह मोटार कंपनी सुरू केलेली आहे. मालोजीराजे यांची कारकिर्द (1917–1948 ) म्हणजे फलटण संस्थानातील सुवर्णकाळच होता कारण त्यामुळे त्यांच्या कारकिर्दीत फलटण संस्थानला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले. त्यांनी आपल्या कारकिर्दीत शिक्षणप्रसारा बरोबरच समाज सुधारणा केल्या ते नुसते संस्थानिक नव्हते तर कर्ते समाजसुधारक होते. त्यांच्याच प्रयत्नामुळे फलटण सारख्या छोटयाशा संस्थानात डॉ. राधाकृष्णन,डॉ. बाबासाहेब आंबेडकर ,डॉ.महर्षि धोंडो केशव कर्वे, न.चि. केळकर, विश्वेश्वराच्या ,30 जागतिक कितीर्चे व्यक्तींनी भेटी दिलेल्या आहेत. यावरून मालोजीरावांचे विद्याप्रेम व गुणीजणांचा चाहता हे गुण स्पष्ट दिसून येतात.

कारण विद्वान ,तत्ववेत्ते, सामाजिक कार्यकर्ते व साहित्यिक यांना फलटण ला बोलावून त्यांच्या ज्ञानाचा लाभ प्रजेला देण्याचे जणू काय त्यांना व्यसनच होते. धनंजयराव गाडगीळ, वि.द.घाटे, वा.म. जोशी, गिरीश , यशवंत, गोपीनाथ तळवलकर, साहित्य सम्राट तात्यासाहेब केळकर, रँग्लर परांजपे , डॉ. राधाकृष्णन, महर्षि अण्णासाहेब कर्वे , सर विश्वेश्वराय्या, यांचे त्यांनी सत्कार घडवून आणले.

मालोजीराव महाराजांचा दुसरा एक गुण विशेष प्रकर्षाने जाणवतो आणि तो म्हणजे त्यांनी केलेले संस्थानातील अस्पृष्यता उध्दाराचे होय. अस्पृश्य समाजाचे मुक्तीदाता डॉ.बाबासाहेब आंबेडकर

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

यांच्याशी त्याचे जवळचे संबंध होते त्यांना संस्थानात आणून योग्य सत्कार केला होताच, त्यांना संस्थानात मेजवानीही दिली होती. संस्थानातील अस्पृश्य वर्गाच्या प्रगतिसाठी शैक्षणिक सवलती व शिष्यवृत्या दिलेल्या होत्या. स929 ला संस्थानात जबाबदार राज्यपध्दतीचा अवलंब करून फलटण कायदे मंडळ अस्तित्वात आले त्या मंडळात मालोजीरावाने एक अस्पृश्य व्यक्तीची नियुक्ती केली. यावरून त्यांच्या विचाराचा पल्ला किती मोठा होता हे सहज लक्षात येते.

महात्मा फुल्यांची सामाजिक कार्य त्यांना माहित होते, सयाजी महाराज, कोल्हापूर, वाडियार इ. समाजसुधारक संस्थानिकांशी त्यांचा जवळचा संबंध होता. त्यांच्या पाऊलावर पाऊल ठेऊन फलटण संस्थानात सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा अभिनव प्रयोग आपल्या कारकिर्दीत यशस्वी करून दाखविला . 1947 ला संस्थानाची श्रीराम मंदिर , दत्त मंदिर , नागेश्वर मंदिर इ. मंदिरे हरीजन लोकांना खुली करणारा आदेश मालोजीरावांनी काढला म्हणूनच कर्मवीर भाऊराव पाटील म्हणतात तसे मालोजीराव हे बोलके सुधारक नव्हते तर कर्ते सुधारक होते.

मालोजीरावांने महाराष्ट्रातील अनेक शैक्षणिक व संशोधनात्मक संस्थाना देणग्या दिलेल्या आहेत. त्याची यादी प्रकरण 3 व 4 मध्ये सविस्तर दिलेलीच आहे. त्यावरून असे लक्षात येते कि मालोजीराजे हे विद्येचे आश्रयदाते व गुणी जणांचे चाहते होते.

1957 ला मालोजीराव बांधकाम मंत्री असताना त्यांच्या कार्याविषयी सांगलीचे राजेसाहेब चिंतामणराव अप्पासाहेब पटवर्धन लिहितात " आपला राज्यकारभार प्रगतिपुर्वक पध्दतीने चालवून श्रीमंत राजेसाहेबांनी सर्वांचे धन्यवाद मिळविले . आपल्या प्रजेच्या आणि संस्थानच्या हिताची त्यांनी नेहमी काळजी वाहिली. समदृष्टीचा व कार्यक्षम कारभार हे त्यांच्या राज्यकारभाराचे ठळक वैशिष्टे म्हणून सांगता येईल. सहकारी चळवळीला प्रोत्साहन देऊन व सहकारी बॅंक स्थापून नीरा कालवा संस्थानात आल्यावर साखर कारखाना उभा करून व इतर अनेक मार्गानी त्यांची प्रजेची आर्थिक भरभराट घडवून आणली. राऊड टेबल कॉन्फरन्यच्या वेळी त्यांनी हिंदी संघराज्याला पाठींबा दिला.

मालोजीराजे यांचे निधन 14-5-1978 ला झाले. त्यानंतर तयांचा पुतळा फलटणमध्ये बसविला त्यानिमित्त काही संदेश आलेले आहेत त्यावेळी तीची स्मरणिका काढली त्यात आहेत त्यातील काही ठराविक संदेश पाहिले तर मालोजीराव यांचे फलटण संस्थानातील कार्य किती उच्च दर्जाचे होते व व्यक्ती म्हणूनमालोजीराव किती निवडक मालोजीरावांच्या कार्यासंबंधीच्या प्रतिक्रिया देत आहे

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR